(Under Regulation 6 of the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016)
FOR THE ATTENTION OF THE CREDITORS OF **BLU-SMART FLEET PRIVATE LIMITED**

RELEVANT PARTICULARS		
1.	Name of corporate debtor	**BLU-SMART FLEET PRIVATE LIMITED**
2.	Date of incorporation of corporate debtor	14.01.2019
3.	Authority under which corporate debtor is incorporated/registered	Registrar of Companies, Ahmedabad
4.	Corporate Identity No./Limited Liability Identification No.of corporate debtor	U63090GJ2019PTC106075
5.	Address of the registered office and principal office (if any) of corporate debtor	15th Floor, A Block, Westgate Business Bay, S.G Road, Jivraj Park, Ahmedabad, Ahmadabad City, Gujarat, India, 380051
6.	Insolvency commencement date in respect of corporate debtor	03.12.2025
7.	Estimated date of closure of insolvency resolution process	01.06.2026
8.	Name and registration number of the in solvency professional acting as interim resolution professional	PAWAN KUMAR GOYAL IBBI/IPA-001/IP-P00875/2017-2018/11473
9.	Address and e-mail of the interim resolution professional, as registered with the Board	304. D.R. Chamber, 12/56, D.B Gupta Road, Karol Bagh, New Delhi-110005. Email: - ca.pawangoyal@gmail.com
10.	Address and e-mail to be used for correspondence with the interim resolution professional	304. D.R. Chamber, 12/56, D.B Gupta Road, Karol Bagh, New Delhi-110005. Email: - blusmartfleet.cirp@gmail.com
11.	Last date for submission of claims	17.12.2025 (14 days from CIRP Commencement date)
12.	Classes of creditors, if any, under clause (b) of sub-section (6A) of section 21,ascertained by the interim resolution professional	None
13.	Names of Insolvency Professionals identified to act as Authorised Representative of creditors in a class (Three names for each class)	NOT APPLICABLE
14.	Relevant Forms and Details of authorized representatives are available at:	Web links: https://www.ibbi.gov.in/home/downloads

Notice is hereby given that the National Company Law Tribunal has ordered the commencement of a corporate insolvency resolution process of the **BLU-SMART FLEET PRIVATE LIMITED** on 03.12.2025

The creditors of **BLU-SMART FLEET PRIVATE LIMITED** are hereby called upon to submit their claims with proof on or before 17.12.2025 to the interim resolution professional at the address mentioned against entry No. 10 above.

The financial creditors shall submit their claims with proof by electronic means only. All other creditors may submit the claims with proof in person, by post or by electronic means.

A financial creditor belonging to a class, as listed against the entry No. 12 above, shall indicate its choice of authorised representative from among the three insolvency professionals listed against entry No.13 above to act as authorised representative of the Financial Creditors in Class (Real Estate Allottees) in Form CA.

Submission of false or misleading proofs of claim shall attract penalties as per Law.

PAWAN KUMAR GOYAL
Interim Resolution Professional
(AFA No. AA1/11473/02/311225/107690, Valid till 31/12/2025)
BLU-SMART FLEET PRIVATE LIMITED

Date: 06.12.2025
Place: New Delhi

Continued in Previous Page...

Kfin Technologies Limited
Address: 301, The Centrium, 3rd Floor, 57, Lal Bahadur Shastri Road, Nav Pada, Kurla (West), Kurla, Mumbai, Maharashtra, India, 400070.
Telephone: +91 40 6716 2222
Email Id: ravelcare.ipo@kfintech.com
Investors Grievance Id: einward.ris@kfintech.com
Website: www.kfintech.com
Contact Person: M. Murali Krishna
SEBI Registration Number: INR000000221

On behalf of Board of Directors
For, Ravelcare Limited
Sd/-
Ayush Mahesh Varma
Chairman & Managing Director
DIN: 08290637

Place: Mumbai
Date: December 05, 2025

THE LEVEL OF SUBSCRIPTION SHOULD NOT BE TAKEN TO BE INDICATIVE OF EITHER THE MARKET PRICE OF THE EQUITY SHARES ON LISTING OR THE BUSINESS PROSPECTS OF RAVELCARE LIMITED.

Disclaimer: Ravelcare Limited is proposing, subject to market conditions, public Issue of its equity shares and had filed the Prospectus with the Registrar of Companies, Mumbai, Maharashtra. The Prospectus is available on the website of the Book Running Lead Manager at ib.marwadichandaranagroup.com, website of the BSE i.e., www.bseindia.com and website of Issuer Company at www.ravelcare.com; Investors should note that investment in Equity Shares involves a high degree of risk. For details, investors shall refer to and rely on the Prospectus including the section titled "Risk Factors" beginning on page 25 of the Prospectus, which has been filed with ROC. The Equity Shares have not been and will not be registered under the US Securities Act (the "Securities Act") or any state securities law in United States and may not be Issued or sold within the United States or to, or for the account or benefit of, "U.S. persons" (as defined in the Regulation S under the Securities Act), except pursuant to an exemption from, or in a transaction not subject to the registration requirements of the Securities Act of 1933.

फळं आरोग्यासाठी उपयुक्तच, पण वय वाढलं की फळांमुळे पायांची ताकद होऊ शकते कमी

फळांचे सेवन आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. प्रत्येक ऋतूमध्ये मिळणारी हंगामी फळे खाल्ल्याने शरीर हायड्रेट राहते, आवश्यक पोषक तत्वे मिळतात, पचनक्रिया सुधारते, चयापचय वाढतो आणि वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते. शरीरातील अशक्तपणा दूर करण्यासाठी फळे प्रभावी ठरतात. जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्सचा महत्त्वाचा स्रोत असल्यामुळे फळांचे सेवन सर्व वयोगटांसाठी उपयुक्त मानले जाते. मात्र वाढत्या वयानुसार शरीराची गरज बदलते आणि काही फळे जी तरुणांसाठी फायदेशीर असतात, तीच वृद्धांसाठी अपायकारक ठरू शकतात. वय वाढल्यावर पचनशक्ती, स्नायूंची ताकद आणि चयापचय हळूहळू कमकुवत होतो. ICMR आणि NINच्या अहवालांनुसार वयानुसार इन्सुलिन संवेदनशीलता, रक्ताभिसरण आणि चयापचय मंदावतो. त्यामुळे काही फळांचे अति सेवन वृद्धांमध्ये अशक्तपणा, कमी ऊर्जा, गॅस, रक्तातील साखरेत चढ-उतार आणि इलेक्ट्रोलाइट असंतुलन निर्माण करू शकते. काही विशिष्ट फळांमुळे वृद्धांच्या पायांची ताकद कमी होणे, संधिवाताच्या वेदना वाढणे, सूज येणे आणि युरिक ॲसिडची पातळी वाढण्याचेही निदर्शनास येते. टरबूज हे शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढणारे फळ असले तरी त्यात पाणी जास्त आणि कॅलरीज कमी असल्याने वृद्धांनी ते अधिक

प्रमाणात घेतल्यास कमी ऊर्जा, रक्तदाब अचानक कमी होणे आणि थकवा जाणवू शकतो. पपई पचनासाठी उपयुक्त असली तरी जास्त प्रमाणात सेवन केल्यास वृद्धांमध्ये अतिसार, अशक्तपणा आणि शरीरातील द्रवपदार्थ झपाट्याने कमी होण्याचा धोका असतो. अननसामध्ये असलेले ब्रोमेलेन हे एन्झाइम जास्त घेतल्यास छातीत जळजळ, गॅस, कमजोरी आणि रक्तदाब कमी होण्याची शक्यता वाढते, ज्यामुळे वृद्धांना चक्कर येऊ शकते. केळीमध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे वृद्धांमध्ये केळीचे अति सेवन झाल्यास स्नायू पेटके, अशक्तपणा आणि हृदयाच्या ठोक्यांमध्ये बदल होऊ शकतो. द्राक्षांमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असल्याने रक्तातील साखरेवर परिणाम होतो, थकवा, पोटफुगी आणि गॅसचा त्रास निर्माण होऊ शकतो. संत्री आणि इतर आंबट हंगामी फळांमुळे वृद्धांमध्ये आम्लता वाढते, जडपणा जाणवतो आणि कॅल्शियमच्या शोषणावरही परिणाम होतो. सफरचंदांमध्ये फायबर मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे जास्त सफरचंद खाल्ल्यास वृद्धांमध्ये गॅस, पोट जड होणे आणि ऊर्जेची कमतरता जाणवू शकते. वृद्धांनी फळे पूर्णपणे टाळू नयेत, मात्र प्रमाण आणि योग्य वेळेचे भान ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. कोणतेही फळ अति प्रमाणात न खाता संतुलित आहाराच्या भाग म्हणून मर्यादित प्रमाणात घेतल्यास त्याचे फायदे टिकून राहतात आणि दुष्परिणाम टाळता येतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक न्याय आणि परिवर्तनाचे शिल्पकार

भारतीय इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी होऊन गेले आहेत की त्यांचे कार्य, विचार आणि जाणीवा एका कालखंडापुरत्या मर्यादित राहत नाहीत; त्या पिढ्यानपिढ्या समाजाला दिशा देतात, प्रेरणा देतात आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला नव्या उंचीवर नेतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असेच कालजयी व्यक्तिमत्त्व होय. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका नेत्याची आठवण नव्हे, तर न्याय, समता, स्वाभिमान आणि संघर्षाच्या मूल्यांना पुनश्च जागृत करणे होय. भारतातील दलित, वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजाच्या उद्धारासाठी त्यांनी केलेले कार्य हे मानवाधिकार, सामाजिक लोकशाही आणि समतामूलक राष्ट्रनिर्मितीचे ध्वजवाहक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व समजून घेण्यासाठी सुरुवातीला ज्या सामाजिक आणि ऐतिहासिक वास्तवात त्यांनी जीवनाची सुरुवात केली ते समजणे आवश्यक आहे.

❒ राजेंद्र बगाटे

अस्पृश्यता ही जणू सामाजिक संस्थाच बनली होती. जन्म म्हणजे कर्म, आणि कर्म म्हणजे जात ही विचारधारा भारतीय समाजावर ठसवण्यात आली होती. परंतु या रूढीवाद, अवैज्ञानिकता आणि सामाजिक विषमतेचे निःशब्द बळी होण्याऐवजी त्यांनी त्याविरोधात बौद्धिक क्रांती उभारली. समाजाने दिलेली ओळख स्वीकारण्याऐवजी त्यांनी स्वतःची ओळख ज्ञान, संघर्ष आणि नेतृत्वातून घडवली. ते म्हणत असत की "माझे आयुष्य हे जन्माचे फळ नाही, तर माझ्या संघर्षाचे यश आहे." त्यांनी शिक्षणाला मुक्तीचे माध्यम बनवले. शिक्षण मिळवणे हे जणू त्यांच्या जीवनातील सामाजिक अन्यायाविरुद्धचे पहिले युद्धच होते. समाजाने 'अस्पृश्य', 'अयोग्य' म्हणत जे दरवाजे बंद केले, ते त्यांनी मेहनतीने, बुद्धिमत्तेने आणि चिकाटीने उघडले. कोलंबिया विद्यापीठातून पीएच.डी., लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधील बॅरिस्टर, कायद्याची पदवी यामुळे ते फक्त भारतासाठीच नव्हे तर जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त विचारवंत ठरले. त्यांचे अध्ययन केवळ पुस्तकापुरते मर्यादित नव्हते; ते सामाजिक वास्तवाचे अभ्यासक होते. त्यांनी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, कायदा, राजकीय तत्त्वज्ञान, स्त्री-अधिकार, धर्म, इतिहास, मानवाधिकार आणि सामाजिक मानसशास्त्र अशा अनेक क्षेत्रांत अभ्यास केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्याचा पाया त्यांच्या व्यक्तीगत संघर्षातून उभा राहिला. जिथे एक 'जात' मनुष्याच्या अस्तित्वाचे मूल्य ठरवत होती, तिथे त्यांनी मानवतेचा, बंधुत्वाचा आणि समतेचा नवा सामाजिक अर्थ प्रस्तावित केला. महाडचा चवदार तळे सत्याग्रह हा फक्त पाण्याचा प्रश्न नव्हता तर तो मानवी प्रतिष्ठा आणि मूलभूत हक्कांचा प्रश्न होता. त्या आंदोलनात "हम पानी लेंगे, हक्क से लेंगे!" असे त्यांनी सांगत भेदभावग्रस्त समाजाला पहिल्यांदा स्वाभिमानाची ताकद दिली. नंतर नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहामध्ये त्यांनी धार्मिक क्षेत्रातील भेदभावाला थेट आव्हान दिले. "मनुष्य देवाच्या निर्मितीचा असतो, परंतु जातव्यवस्था मनुष्यांच्या बनावट नियमांची" ही घोषणा ज्या समाजात अस्पृश्यांना देवासमोर उभे राहण्याचा अधिकार नव्हता, त्या समाजात क्रांतिकारी होती. या आंदोलनांनी अस्पृश्यतेच्या भिंती फक्त हादरवल्या नाहीत, तर कोसळायला सुरुवात केली. त्यांच्या सामाजिक कार्याचा आणखी एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे महिलांसाठी दिलेले अधिकार. स्त्रियांच्या शिक्षणाचे, समतेचे आणि स्वातंत्र्याचे त्यांनी सर्वाधिक जोरदार समर्थन केले. हिंदू कोड बिलच्या माध्यमातून स्त्रियांना संपत्ती, विवाह, घटस्फोट आणि पुनर्विवाहाच्या अधिकारांची हमी देण्याचा त्यांचा प्रयत्न हा स्त्री-मुक्तीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरला. तथापि, या सुधारणा मंजूर करण्यास विरोध झाल्याने त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा देताना स्पष्टपणे सांगितले की "जे समाज स्त्रीला समानता देत नाहीत, त्यांची प्रगती कधीही होऊ शकत नाही." भारतीय संविधानाच्या रूपात त्यांनी देशाला नव्या सामाजिक व्यवस्थेचा आराखडा दिला. हे संविधान फक्त कायद्यांचा संच नाही तर ते भारतीय नागरिकांच्या स्वातंत्र्याचे, सन्मानाचे आणि मानवाधिकारांचे संरक्षण करणारे जिवंत दस्तऐवज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत की "राजकीय लोकशाही पुरेशी नाही; ती सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीवर आधारित असली पाहिजे." यामध्येच भारतीय समाजक्रांतीचे मूलतत्त्व दडलेले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक क्षेत्रातही मोठे योगदान दिले. भारतातील शेतकरी, कामगार यांचे प्रश्न त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून मांडले. जमीन सुधारणा, राष्ट्रीय जलनीती, औद्योगिकीकरण, बँकिंग क्षेत्र, वित्तीय व्यवस्थापन आणि कामगार कायदे या सर्व क्षेत्रांत त्यांनी मार्गदर्शक धोरणे मांडली. रिजर्व्ह बँकेच्या स्थापनेमागील त्यांची आर्थिक संकल्पना ही त्यांच्या अभ्यासाची खोली दर्शवणारी होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य फक्त समाजसुधारणेपुरते मर्यादित नव्हते तर ते मानवमुक्तीचे अभियान होते. त्यांनी धर्माच्या नावावर चालणाऱ्या अन्यायाला आव्हान दिले आणि अखेर १४ ऑक्टोबर १९५६ रोजी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्म स्विकारला. हा निर्णय संतापाचा नव्हता, तर आत्मसन्मानाचा आणि विवेकाधिष्ठित धर्माचा स्वीकार होता. ते म्हणाले होते की "मी हिंदू म्हणून जन्मलो, हे माझ्या हातात नव्हते; पण मी हिंदू म्हणून मरणार नाही, हे मी ठरवले." आणि या निर्णयातून त्यांनी भारतीय इतिहासाला नव्याने 'बौद्धयुग' दिले. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतीदिनाच्या निमित्ताने आपण त्यांच्या विचारांकडे पाहतो तेव्हा एक प्रश्न उभा राहतो की त्यांचे स्वप्न कितपत पूर्ण झाले? संविधानाचा आदर करणे, समानता स्वीकारणे, जातभेद नष्ट करणे, मानवतेच्या मूल्यांचे पालन करणे ही मूल्ये आज अजूनही संघर्षात आहेत. जातीय हिंसा, सामाजिक विषमता, आर्थिक असमानता, महिलांवरील अत्याचार, धार्मिक ध्रुवीकरण आणि शिक्षणातला वर्गविचार आजही अस्तित्वात आहे. म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक चळवळ संपलेली नाही तर ती अजूनही चालूच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मंत्र "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा मंत्र केवळ घोषवाक्य नसून सामाजिक परिवर्तनाचे क्रियासूत्र आहे. शिक्षण हे व्यक्तीला विचार देतं; संघटना व्यक्तीला शक्ती देते; आणि संघर्ष व्यक्तीला इतिहास बदलण्याची ताकद देतो. हा संघर्ष द्वेषाचा नाही; तर न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेच्या स्थापनेसाठी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची महत्ता फक्त भारतीय समाजापुरती मर्यादित नाही तर जगातील सामाजिक न्यायाच्या लढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मानवसंस्कृतीच्या इतिहासात अभिमानाने घेतले जाते. ते फक्त संविधानकार नाहीत; ते मानवतेचे अभियंते आहेत. ते फक्त नेता नाहीत; ते विचारयुगाचे निर्माता आहेत. ते फक्त इतिहासाचा भाग नाहीत; तर ते भविष्याचा मार्ग आहेत. आज ६ डिसेंबर रोजी असणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्मृतीदिन हा केवळ अभिवादनाचा क्षण नसून जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. त्यांच्या कार्याचे, तत्त्वज्ञानाचे, सामाजिक उभारणीच्या दृष्टिकोनाचे अनुसरण करणे हीच खरी कृतज्ञता आहे. त्यांचा विचार जिवंत राहिला, न्यायव्यवस्था समतामूलक राहिली, समाजाने मनुष्याला मनुष्य म्हणून स्वीकारले तरच त्यांचे स्वप्न पूर्ण होईल. आपण सर्वांनी एकत्र येऊन केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला नव्हे, तर त्यांच्या विचारांना वंदन करणे ही काळाची गरज आहे.

अधोगती दर्शवणारी निवडणूक

❒ श्याम ठाणेदार

राज्यातल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. तब्बल नऊ वर्षांनंतर झालेल्या या निवडणुकीत मतदारांनी २६४ अध्यक्षांसाठी आणि ६ हजार ४२ सदस्यांसाठी भरभरून मतदान केले. या निवडणुकीत मतदारांचा उत्साह दिसून आला. ही निवडणूक अभूतपूर्व ठरली कारण यापूर्वी मतदारांनी जे कधीही पाहिले नव्हते ते या निवडणुकीत पहायला मिळाले. निवडणूक आयोगाने निवडणुकीत जो घोळ घातला तो यापूर्वी कधीही पहायला मिळाला नाही. निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. निवडणूक आयोगाच्या भोंगळ कारभारामुळे काही नगरपालिकांच्या निवडणुका ऐनवेळी पुढे ढकलाव्या लागल्या त्यामुळे ऐन मतदानाच्या दिवशी न्यायालयाने मतमोजणी पुढे ढकलण्याचा आदेश दिला. या निवडणुकीत राजकीय पक्षांनी तर हद्दच केली. उमेदवारांची पळवापळवी, अडवाआडवी त्यानंतर धनशक्तीचा मुक्त वापर, बोगस मतदारांची धरपकड, कार्यकर्त्यांची तुंबळ हाणामारी, नेत्यांची एकमेकांवर पातळी सोडून केलेली टीका, ईव्हीएम मध्ये झालेला बिघाड, मतदार यादीतील घोळ या सर्व गोष्टी या निवडणुकीत पाहायला मिळाल्या. राज्यात सत्तेत असलेले मित्रपक्ष एकमेकांविरुद्ध उभे ठाकून विरोधी पक्षांशी हातमिळवणी करून मित्र पक्षांवरच टीका करत होते तर विरोधी पक्षातील काही नेते सत्तेतील पक्षाशी हातमिळवणी करून आपल्याच सहकारी पक्षांना लक्ष करत होते. कोण कोणाच्या विरोधात आणि कोण कोणाच्या बाजूने हेच समजत नव्हते. महाराष्ट्रात हे पहिल्यांदाच पहायला मिळत होते.

पनवेल महानगरपालिका

जाहीर निविदा

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खाली नमूद कामांकरिता योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून जाहीर निविदा बी-१ नमुन्यात मागवीत आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	कामाची अंदाजित किंमत रु. (Without GST)	अनामत रक्कम रु.	निविदा प्रत किंमत + १८% विक्री कर = एकूण निविदा किंमत	कामाची मुदत
१	पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-ड, प्रभाग क्र.१८ मधील साई पार्क ते हमजा रेसिडेन्सी पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. (PMC/CE/२६८/२०२५-२६)	८,२५,५९७/-	८३००/-	५०० + ९० = ५९०	२ महिने

याकामी कोरी निविदा दिनांक ०४/१२/२०२५ पासुन दि. १०/१२/२०२५ पर्यंत सांय. ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) बांधकाम विभागात उपलब्ध होतील.

१) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत लखोटा क्र. १ मध्ये सादर करण्याचा आहे.
२) सीलबंद निविदा दि. १०/१२/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात स्विकारण्यात येतील.
३) प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो दि. ११/१२/२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.

प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजुर अथवा ना मंजुर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

जा.क्र पमपा/बांधकाम/६५२५/प्र.क्र.१९७/४६४१/२०२५
दि. ४/१२/२०२५

सही/-
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका

ग्लान्स फायनान्स लिमिटेड

सीआयएन : L65920MH1994PLC081333
नोंदणीकरण कार्यालय : ७, किताब महल, १९२, डॉ. डी.एन. रोड, फोर्ट, मुंबई- ४००००१.
दूरध्वनी क्रमांक : ०२२-४०१००१९३, **ईमेल :** glance@glancefinance.in
वेबसाइट : www.glancefinance.in

प्रत्यक्ष शेअर्सच्या हस्तांतरण विनंतीच्या पुनर्लेखनासाठी विशेष विंडो

०२ जुलै २०२५ च्या सेबीच्या परिपत्रक क्रमांक सेबी/एचओ/एमआयआरएसडी/एमआयआरएसडी-पीओडी/पी/सीआयआर/२०२५/९७ नुसार, भौतिक स्वरूपात इक्विटी शेअर्स धारण करणाऱ्या शेअरधारकांना कळविण्यात येते की शेअर ट्रान्सफर डीड पुन्हा लॉज करण्यासाठी ०७ जुलै २०२५ ते ०६ जानेवारी २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी एक विशेष विंडो खुली आहे. ही सुविधा १ एप्रिल २०१९ पूर्वी दाखल केलेल्या ट्रान्सफर डीडसाठी उपलब्ध आहे, जे कागदपत्रे/प्रक्रियेत/किंवा इतर कोणत्याही कारणामुळे नाकारले गेले/परत केले गेले/उपस्थित राहिले नाहीत. ट्रान्सफरसाठी पुन्हा लॉज केलेले शेअर्स फक्त डीमटेरियलाइज्ड स्वरूपात जारी केले जातील. ३१ मार्च २०२१ ची पूर्वीची अंतिम मुदत चुकवलेल्या पात्र शेअरधारकांनी कंपनीच्या रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजन्ट्स यांना एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रा. लि., सी १०१, २४७ पार्क, एल. बी. एस. मार्ग, विक्रोळी (प) मुंबई ४०० ०८३ दूरध्वनी: +९१-२२-४९१८६२७० किंवा कंपनीला **cs@glancefinance.in** वर संपर्क साधा.

ग्लान्स फायनान्स लिमिटेडसाठी
सही/-
नरेंद्र कर्णावत
(संचालक)
(डीआयएन : ०००२७१३०)

ठिकाण : मुंबई
तारीख : ०५.१२.२०२५

राजा बहादुर इंटरनॅशनल लिमिटेड

PITTIE

सीआयएन क्रमांक : L17120MH1926PLC001273
नोंदणीकृत कार्यालय : हमाम हाऊस, तिसरा मजला, अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दूरध्वनी क्रमांक : ०२२ २२६५४२७८
ईमेल आयडी : investor@rajabahadur.com **वेबसाइट :** www.rajabahadur.com

प्रत्यक्ष शेअर्सच्या हस्तांतरण विनंत्या पुन्हा दाखल करण्यासाठी विशेष विंडोची सूचना

तुम्हाला कळविण्यात येत आहे की, सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) ने २ जुलै २०२५ च्या परिपत्रक क्रमांक सेबी/एचओ/एमआयआरएसडी/एमआयआरएसडी-पीओडी/पी/सीआयआर/२०२५/९७ द्वारे, १ एप्रिल २०१९ च्या अंतिम मुदतीपूर्वी दाखल केलेल्या आणि नाकारलेल्या किंवा परत केलेल्या परंतु कागदपत्रांमध्ये/प्रक्रियेत कमतरता असल्यामुळे किंवा अन्यथा दुर्लक्षित केलेल्या हस्तांतरण करारांच्या पुनर्लॉजिंगसाठी ७ जुलै २०२५ ते ६ जानेवारी २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी एक विशेष विंडो उघडण्याचा निर्णय घेतला आहे. या कालावधीत, संबंधित कंपनीकडे हस्तांतरणासाठी सिक्युरिटीज पुन्हा लॉज केल्या जातील आणि हस्तांतरण-सह-डीमटेरियलायझेशनसाठी पुन्हा लॉजिंग केले जातील.

संबंधित गुंतवणूकदारांना विनंती आहे की, त्यांनी वरील वेळेत आमच्या रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट्स (आरटीए), सॅटेलाइट कॉर्पोरेट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या वेबसाइट - www.satellitecorporate.com वर भौतिक शेअर्सच्या हस्तांतरणाची विनंती पुन्हा दाखल करावी. संबंधित गुंतवणूकदारांना या एक-वेळच्या मुदतीचा लाभ घेण्यास प्रोत्साहित केले जाते.

राजा बहादूर इंटरनॅशनल लिमिटेड साठी
सही/-
तनया दर्यानानी
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
आयसीएसआय सदस्यता क्रमांक एसीएस : ३७१८१

तारीख : ०५.१२.२०२५

सार्वजनिक सूचना

माझे क्लायंट श्री. मनवित अरविंद वेकारिया यांच्या वतीने नोटीस जारी करण्यात येत आहे, जे सध्या फ्लॅट क्रमांक २१३, दुसरा मजला, डी-विंग, राज आर्केड सीएचएस लिमिटेड, महावीर नगर, डहाणूकरवाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०००६७ येथे राहतात.

माझ्या क्लायंटच्या दिवंगत आई श्रीमती भारती अरविंद वेकारिया, श्री. मन्वित अरविंद वेकारिया आणि श्रीमती पायल मन्वित वेकारिया, डी-विंगमधील राज आर्केड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोसायटीच्या इमारतीत, दुसऱ्या मजल्यावर, ६८० चौरस फूट बिल्ट अप एरिया असलेल्या फ्लॅट क्रमांक २१३ या फ्लॅट जागेचे संयुक्त मालक आहेत. हा फ्लॅट महावीर नगर, डहाणूकरवाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०००६७ (यापुढे उक्त फ्लॅट परिसर म्हणून संदर्भित) येथे आहे.

माझे अशील यांची आई श्रीम. भारती अरविंद वेकारिया यांचा मृत्यू दि. १८.१०.२०२५ रोजी मुंबई येथे झाला, त्यांच्या मागे कायदेशीर वारस अर्थात १. श्री. अरविंद रतिलाल वेकारिया (पती) आणि (२) श्री. तन्मय अरविंद वेकारिया (मुलगा), ३. श्री. तन्मय अरविंद वेकारिया (मुलगा) हे आहेत.

मूळ रिलीज करार हे १. श्री. अरविंद रतिलाल वेकारिया व २. श्री. तन्मय अरविंद वेकारिया ज्यांना यापुढे रिलीझर्स म्हणून संबोधले जाईल आणि श्री. मन्वित अरविंद वेकारिया यांना यापुढे रिलीझी म्हणून संबोधले जाईल, यांच्यातील मूळ रिलीज करार, ज्याचा नोंदणीकरण क्रमांक एमबीई१७-१८१७६-२०२५ आहे, सदर दि. ०६.११.२०२५ अंतर्गत नोंदणीकृत दस्तावेज असून वरील सदर फ्लॅट जागेच्या संबंधात आहेत.

जर कोणत्याही व्यक्ती किंवा व्यक्तींना, किंवा बँक किंवा वित्तीय संस्थेला माझ्या क्लायंटच्या आई श्रीमती भारती अरविंद वेकारिया यांच्या वारसा हक्क, भेटवस्तू, गहाणखत, ट्रस्ट किंवा इतर कोणत्याही प्रकारे दावा करण्याचा कोणताही आक्षेप असेल/असतील, तर ते त्यांचे दावे/दावे कागदोपत्री पुराव्यांसह माझ्या कार्यालयात श्री. जगदीश त्र्यंबक डोंगरदीव, वकील उच्च न्यायालय आणि नोटरी (भारत सरकार), प्लॉट क्रमांक २३२, खोली क्रमांक १८, श्री मंगल सीएचएस लिमिटेड, गोराई २, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०००९२ येथे प्रकाशित सूचनेपासून १५ दिवसांच्या आत अधोस्वाक्षरीकर्त्यांना पाठवू शकतात

सही/-
श्री. जगदीश त्र्यंबक डोंगरदिवे
वकील उच्च न्यायालय आणि नोटरी
ठिकाण : मुंबई दि. ०६.१२.२०२५

बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

बँक ऑफ बडोदा, झोनल स्ट्रेस्ड ॲसेट्स रिकव्हरी शाखा : मेहेर चेंबर्स, ग्राउंड फ्लोअर, डॉ. सुंदरलाल बहल मार्ग, बॅलार्ड इस्टेट मुंबई - ४००००१
दूरध्वनी क्रमांक : ०२२-४३६८३८०१-०३ **ई-मेल :** ARMBOM@bankofbaroda.com

कपात सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ६(२) आणि/किंवा नियम ८(६) अंतर्गत सूचना

बीओबी : झेडओएसएआरबी : मॅकमेड : लिलाव : **तारीख : २९.१०.२०२५**

प्रति,
१. मेसर्स मॅकमेड कॉंक्रीट प्रॉडक्ट्स एमएफजी. प्रा. लि.
पत्ता :- औद्योगिक जमीन गट क्रमांक ५१७ (भाग), वाजेश्वरी मंदिराजवळ, गाव केळठण, तालुका - वाडा, जिल्हा - ठाणे - ४०१२०४.
तसेच येथे :- ए) बी-१०७, रो हाऊस, जसेल पार्क भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०११०५. श्री. प्रेमचंद नारायण चंद्र सामंथा (संचालक/जामीनदार). बी) बी-१०७, रो हाऊस, जसेल पार्क भाईंदर (पूर्व), ठाणे-४०११०५.
श्रीमती रत्ना प्रेमचंद सामंथा (संचालक/जामीनदार). सी) बी-१०७, रो हाऊस, जसेल पार्क भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०११०५. श्री. रोमीन प्रेमचंद सामंथा (संचालक/जामीनदार). डी) बी-१०७, रो हाऊस, जसेल पार्क भाईंदर (पूर्व), ठाणे-४०११०५.
विषय : सिक्युरिटीजेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफैसी ॲक्ट, २००२) च्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ६(२) आणि/किंवा नियम ८(६) अंतर्गत सूचना.
संदर्भ : - १. सरफैसी कायदा २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत २१.१२.२०१५ रोजी जारी केलेली मागणी सूचना.
२. २०.०२.२०१६ रोजी सरफैसी कायदा २००२ च्या कलम १३ (४) अंतर्गत ताबा सूचना

प्रिय सर/मॅडम,
ज्याअर्थी बँक ऑफ बडोदा, शाखा : झेडओएसएआरबी, मेहेर चेंबर्स ग्राउंड फ्लोअर, डॉ. सुंदर लाल मार्ग, ओप्पो पेट्रोल पंप, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०००१, ही सुरक्षित कर्जदार बँक असून, सरफैसी कायदा २००२ च्या कलम १३(२) (यापुढे कायदा म्हणून संदर्भित) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ३ (यापुढे नियम म्हणून संदर्भित) अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून, अधिकृत अधिकारी यांनी २१.१२.२०१५ रोजी मागणी सूचना जारी केली आहे ज्यामध्ये तुम्हाला कर्जदार/गहाणखत/जामीनदार म्हणून सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत मागणी सूचनामध्ये नमूद केलेली रक्कम परत करण्याचे आवाहन केले आहे.
आणि तुम्ही रक्कम परत करण्यात अयशस्वी झाला असला तरी, नियम ४ आणि/किंवा नियम ८ सह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून अधोस्वाक्षरीकर्त्याने सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे (यापुढे सदर मालमत्ता म्हणून संदर्भित) अधिक विशेषतः खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये वर्णन केला आहे.
सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतल्यानंतरही, तुम्ही वरील ताबा सूचनेत नमूद केल्याप्रमाणे बँकेला देय रक्कम दिलेली नाही. सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात सरफैसी कायदा, २००२ च्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे तुमचे लक्ष वेधले जात आहे.
म्हणून तुम्हा सर्वांना विनंती आहे की, ताबा सूचनेमध्ये नमूद केलेली देणी, लागू व्याज, खर्च, शुल्क आणि खर्चासह ही सूचना मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत भरा आणि खाली नमूद केल्याप्रमाणे सुरक्षित मालमत्ता परत करा. जर तुम्ही वरील देणी भरली नाहीत आणि ही सूचना मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत सुरक्षित मालमत्ता परत केली नाही, तर बँकेला ई-लिलाव विक्री सूचना प्रकाशित करून सार्वजनिक ई-लिलावाद्वारे सुरक्षित मालमत्ता विकण्यास भाग पाडले जाईल. ई-लिलावाची तारीख, वेळ आणि मालमत्तेची राखीव किंमत तुम्हाला स्वतंत्रपणे कळवली जाईल.

स्थावर मालमत्तेचे वर्णन :

सुरक्षित मालमत्ता/मालमत्तेचे वेळापत्रक

अनु. क्र.	जंगम/स्थावर मालमत्तेचे वर्णन	ताब्याची तारीख	ताब्यात घेण्याचा प्रकार (प्रतीकात्मक/भौतिक)	ताबा सूचना प्रकाशित झाल्याची तारीख
१.	इंडस्ट्रीयल जमिन गट क्र. ५१७ (भाग) वाजेश्वरी मंदिरजवळ, गाव केळठण, तालूका वाडा, जिल्हा ठाणे ४०१ २०४.	२०.०२.२०१६	प्रत्यक्ष	२६.०२.२०१६

तुमचा विश्वासू,
प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडोदा
**शाखा